प्रेसनोट

दि.06.04.2024

उल्हासनगर पोलीस ठाणे - मनाई आदेश भंग

आरोपी हंशु बिपीन झा, वय 20 वर्षे, रा.श्रीराम चौक, उल्हासनगर-2 यास पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-4, उल्हासनगर यांनी ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगरे, व रायगड जिल्हयातील कर्जत व पनवेल तालुका या महसुली हद्दीतुन दोन वर्षे कालावधीकरिता हद्दपार करण्याचे आदेश, दि.09.03.2024 अन्वये दिले होते. परंतू सदर आरोपी याने त्यास सदर पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-4,उल्हासनगर यांचे परवानगीशिवाय प्रवेश करण्यास मनाई असताना सदर मनाई आदेशाचा भंग करून, दि.06.04.2024 रोजी 02.30 वा. चे सुमारास, दुर्गामातानगर कमानीच्या बाजुला, उल्हासनगर-2 येथे एक लोखंडी सुरा बेकायदेशिररित्या जवळ बाळगला असताना, उल्हासनगर पोलीस ठाणे चे पथकास मिळुन आला. सदर प्रकाराबाबत सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादी वरून आरोपीविरूध्द गुन्हा रजि. नं. ।। 538/2024 भारतीय हत्यार कायदा कलम 4,25 सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 142,37(1),135 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन, आरोपी हंशु बिपीन झा, वय 20 वर्षे यास अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा तपास पोना/3525 धोधडे हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,

पोलीस आयुक्तालय,

ठाणे शहर